# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९

ई-मेल- *jtdirrom@gmail.com* *website – www.jdteromumbai.com*


परिपत्रक

**अत्यंत महत्त्वाचे/तातडीचे**

क्र. ४/विकामुं/तंशि/ईबीसी/२०१६/ 5460

दिनांक : 8 AUG 2016

प्रति,

सर्व खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित
एमबीए, एमसीए, अभियांत्रिकी पदवी/पदविका,
औषधनिर्माणशास्त्र पदवी/पदविका महाविद्यालये.

विषय : खाजगी विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत शिक्षण संस्थेमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या ५० टक्के प्रतिपूर्तीबाबत (शै.वर्ष २०१५-१६)....

संदर्भ : १. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. ४/विकामुं/तंशि/ईबीसी/२०१५/२६६१, दि. १५/०९/२०१५

२. या कार्यालयामार्फत दि. ३०/०९/२०१५ रोजी आयोजित केलेला Orientation Programme

सर्व खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित एमबीए, एमसीए, अभियांत्रिकी पदवी/पदविका, औषधनिर्माणशास्त्र पदवी/पदविका महाविद्यालयांना कळविण्यांत येते की, प्रत्येक शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यानंतर प्रवेशित आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या ५० टक्के प्रतिपूर्तीबाबतचे ऑनलाईन अर्जांचे प्रस्ताव सादर करण्याच्या आधी ह्या कार्यालयामार्फत **Orientation Programme** आयोजित करुन सर्वच संस्थांना ह्या योजनेच्या नियम, निकष व अटींबाबतचे मार्गदर्शन केले जाते. त्याप्रमाणे गतवर्षी म्हणजेच शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करिता संदर्भीय क्र. २ अन्वये Orientation Programme आयोजित केलेला होता. सदर Orientation Programme मध्ये ज्या संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांना सूचित करण्यांत आले होते की, **“ऑनलाईन पध्दत सुरु होऊन २ वर्ष लोटल्यानंतरही ४० ते ५० टक्के संस्थांनी त्रुटी पूर्ततेबाबत तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाला प्रतिसाद न दिल्यामुळे शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून विभागीय स्तरावर होणाऱ्या ईबीसी अर्जांच्या छाननीनंतर संस्थांना त्रुटीपूर्ततेकरिता यादी पाठविण्यांत येणार नाही.”** याबाबत सर्व संस्थांना संदर्भीय क्र.१ च्या परिपत्रकानुसारही आधीच सूचित करण्यांत आले होते. परंतु असे सूचित करुनही व संस्थांना या योजनेच्या सर्व मार्गदर्शक सूचना ह्या कार्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देऊनही संस्थास्तरावर योग्य प्रकारे छाननी न करताच या कार्यालयाकडे अर्ज सादर केले जातात. वास्तविक ह्या करिता संस्थांकडून विहीत नमुन्यातील हमीपत्रही प्रस्तावासोबत घेतले जाते. सदर हमीपत्रानुसार संस्थांनी एकही त्रुटी प्रस्तावात न ठेवणे अपेक्षित आहे.

सर्व संस्थांना याद्वारे कळविण्यांत येते की, प्रस्तावित विद्यार्थ्यांचे आर्थिक नुकसान होऊ नये म्हणून एक विशेष बाब म्हणून शै.वर्ष २०१५-१६ च्या त्रुटींबाबत संस्थांना ईबीसी ऑनलाईन प्रणालीच्या Message Box मध्ये त्यांच्या प्रस्तावासोबत जोडलेल्या यादीची Scan केलेली प्रत पाठविण्यांत आली आहे. तसेच सदर त्रुटींची पूर्तता कार्यालयीन कामकाजाच्या १२ दिवसांमध्ये करण्याबाबत सूचित केलेले आहे. सदर छाननीचे काम चालू असून संस्थांनी त्यांच्या त्रुटींबाबतची यादी Message Box मध्ये आली आहे की नाही, याबाबत वेळोवेळी संकेतस्थळ पहावे.

सर्व संस्थांच्या त्रुटी पूर्ततेनंतर सदर अर्ज Online Approved करुन अंतिम अंदाजपत्र शासनास सादर करावयाचे असल्याने संबंधीत संस्थांनी, दिलेल्या कालावधीमध्ये विनाविलंब सर्व त्रुटींची पूर्तता करणे अनिवार्य आहे. विहीत कालावधीत ज्या संस्था त्रुटींची पूर्तता करणार नाहीत. अशा विद्यार्थ्यांचे अर्ज नामंजूर (Reject) करण्यांत येतील. याची सर्व संस्थांनी नोंद घ्यावी.

(प्रमोद अं. नाईक)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई